ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

# इ. ९ वी च्या मराठी पाठयपुस्तकातील आशयातील ताणतणावाचे समायोजन या जीवन कौशल्याचा शोध.

प्रा. सतिश घाडगे,
शिक्षणशास्त्र महाविद्यालय, संगमनेर.

**प्रस्तावना :**

कोणत्याही शिक्षणाचा हेतू मानवी जीवनाला सहाय्य करणे जसे आहे तसेच अडचणी दूर करणे हा सुध्दा आहे. केवळ साक्षर करणे, नोकरी मिळवणे ही इतर उद्दिष्टे झाली.

शिक्षणातून आता व्यापक अपेक्षा ठेवणे गैर नाही. आजच्या काळात स्पर्धेमुळे, लोकसंख्यावाढीमुळे, वाढत्या अपेक्षामुळे, जीवनशैलीमुळे अनेक समस्या निर्माण झालेल्या आहेत.

शालेय शिक्षण हे संप ूर्ण शिक्षण प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक आहे. व्यक्ती व राष्ट्र या दोन्हींच्या विकासप्रक्रियेत या घटकाने महत्त्वाची कामगिरी बजवावी अशी अपेक्षा आहे.

ज्ञानाचे नाते शाळेबाहेरील जीवनाशी जोडणे पाठांतरातून सुटका, शिक्षण हे पाठयपुस्तक केंद्रित न राहता मुलांच्या वाढीसाठी त्याचा उपयोग करणे इ. अपेक्षा राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा .२००५ ने व्यक्त केल्या आहेत.

१९९७ ला Who ने जीवन कौशल्ये स्विकारली त्याचे कारण माणसाला आरोग्यपूर्ण समाधानी यशस्वी जीवन जगण्यासाठी बळ द्यावे, सक्षम करावे हाच आहे. यशस्वी होण्याचे तंत्र आपोआप होणारे आहे. जगण्याची कला जाणीवपुर्वक शिकावी लागते. सामान्य माणूस ही कला अवगत करू शकतो. हा विश्वास ठेवूनच त्याचा समावेश पाठयपुस्तकात केला आहे.

आजच्या स्पर्धेच्या, धकाधकीच्या काळात प्रत्येकाला ताणतणावाला सामोरे जावे लागते. विशेषता नोकरी स्विकारल्यानंतर, कौटुंबिक जबाबदाऱ्या पेलताना विशेष करून घरातील मोठया व्यक्तीनाच या ताण–तणावाचा सामना करावा लागतो. हा ताण असहय झाल्यावर कोणताही व्यक्ती असहाय होतो. त्यातून वेगळयाच समस्यांना तोंड द्यावे लागते.

हा भाग जसा शिक्षणानंतरचा झाला तसेच शालेय शिक्षणात शालेय ताणतणावाच्या संदर्भात

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

ही राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा – 2005 मध्ये याचा स्पष्ट उल्लेख आहे की परीक्षामुळे ताण–तणाव वाढतो. चांगले प्रदर्शन करण्यासाठी विद्यार्थी तणावग्रस्त असतात.

साचेबध्द अध्यापन पध्दतीचा यावर त्यांनी काही उपाय ही सुचविले आहेत. जसे की पुनरपरीक्षा, छोटया अवधीच्या परीक्षा, पाठ आधारित परीक्षा ऐवजी क्षमता आधारित तसेच समस्या आधारित परीक्षा तसेच या दरम्यान समुप देशनाची आवश्यकता ही त्यांनी सुचविलेली आहे. तसेच शालांत परीक्षा दरम्यान helpline व्दारे ही मार्गदर्शन मिळू शकते .

संशोधकाचा उद्देश केवळ उणिवा शोधणे नाही. मुळातच साहित्याचे निकष एखादयाने ठरवून त्या मोजपटटीने त्याचे मूल्यमापन करणेच मुळातच चूक आहे. मग संशोधनाची गरज का ? तर जीवन कौशल्याचा समावेश झाला आहे.

यातील काही कौशल्याचा थेट संबंध मानवी मनाशी संबंधीत आणि साहजिकच त्याचा संबंध साहित्याशी येतो. त्याच्या अनुषंगाने 'ताण–तणावाचे समायोजन' या जीवन कौशल्याचा विचार पाठयपुस्तकातून कसा केला आहे. हे शोधण्याचा प्रयत्न संशोधक करत आहे.

आज संपूर्ण जगात ज्या काही व्याधीने ग्रस्त अनेक लोक आहेत. त्यापैकी 'ताण–तणाव' हा एक महत्वपुर्ण भाग आहे. याचे योग्य मार्गदर्शन नाही. त्यामुळे संशोधकाने त्या जीवन कौशल्याचा पाठयपुस्तकातून कसा विचार केला आहे. हे शोधण्याचे ठरवले आहे.

संशोधकाचा उद्देश पाठयपुस्तकातील उणिवा शोधणे हा नाही. मुळातच एखादे निकष आधी ठरवून त्या मोजपटटीने साहित्याकृतीचे मोजमाप करणे जसे चुकीचे आहे. तसेच कोणतेही पाठयपुस्तक पूर्णतः सर्वांच्या गरजा पूर्ण करणारे असतील असेही असू शकत नाही. तरीही नव्याने निर्माण झालेल्या पाठयपुस्तकातून भाषेच्या व जीवनाच्या अनेक बाबींना सामावुन घेण्याचा जो प्रयत्न आहे तो यथायोग्य आहे.

त्यामुळे संशोधनाच्या संख्यात्मक निष्कर्षात जरी टक्केवारी, एखादया कौशल्याची कमी दिसत असेल तर ती उणिव नाही. तर त्यात दाखवलेली बाब आहे.

कारण कलाकार विशिष्ठ उर्मीने एखादी कविता, कथा लिहितो. नंतर त्याच्यातून आपणाला विशिष्ठ मूल्य वगैरे दिसतात. त्यामुळे एखादे विशिष्ठ जीवन कौषल्य आहेत किंवा नाही. म्हणून

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

पाठयपुस्तकाचे महत्त्व कमी जास्त होत नाहीत.

पाठयपुस्तकाचे महत्त्व केवळ मूल्यांच्या कमी जास्त पणावर अवलंबुन नसते. अनेक गोष्टी त्यामध्ये असतात. त्यातील एक भाग शोधण्याचा हा प्रयत्न आहे.

**संशोधन समस्या :**

मराठी विषयातून ज्या साहित्याचा आपण रसास्वाद घेतो. त्या साहित्याकृती मानवी भावनांच्या रसास्वाद घेतो. त्या साहित्यकृती मानवी भावनांच्या मनाचा शोध घेण्याचे काम करीत असतात.

हा जसा एका बाजूने मानवी जीवनाचा शोध असतो. तसेच ते जीवनावरचे भाष्य असते. साहित्यातून मानवी भावनांचे विरेचन होत असते. तसेच आपल्या जीवनाला अर्थ ही प्राप्त होत असतो. काही अनुभवातून शिकतो. काही वाचून शिकतो. एखादे वाक्य एखादयाला खूप प्रेरणादायी वाटते. तसेच एखादया उपक्रमाने कोण्या एकाच्या जीवनाला कलाटणी ही मिळू शकते. एखादया जीवन कौशल्याशी निगडीत असे प्रसंग, उपक्रम आहेत का? याचाच शोध प्रस्तुत संशोधनातून घेण्याचे प्रयोजन आहे.

म्हणून संशोधकाने पुढील समस्या निश्चित केली आहे.

**इ. ९ वी च्या मराठी पाठयपुस्तकातील आशयातील ताणतणावाचे समायोजन या जीवन कौशल्याचा शोध.**

**उद्देश :**

- गद्य व पद्य पाठाच्या उपक्रमातून ताण–तणावाचे समायोजन या कौशल्याचा शोध घेणे.
- गद्य व पद्य पाठातून ताण –तणावाच्या प्रसंगाचे शोध घेणे.
- गद्य व पद्य पाठाच्या उपक्रमातून ताण–तणाव समायोजन या कौशल्याचा शोध घेणे.

**व्याप्ती व मर्यादाः–**

- प्रस्तुत संशोधन माध्य. स्तरापुरतेच मर्यादित आहे.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

- संशोधन माध्य. स्तरावरील मराठी पाठयपुस्तका पुरतेच मर्यादित आहे.
- माध्य. स्तरावरील मराठी पाठयपुस्तकातील ताण–तणाव समायोजन या कौशल्यापुरतेच या संशोधनाची मर्यादा आहे. इतर कौशल्याचा या मध्ये विचार केलेला नाही.
- सदर सशोधनात मराठीतील फक्त गद्य व पद्य पाठाचाच विचार केला आहे.
- संशोधनावरून निघणाऱ्या निष्कर्शा फक्त माध्यमिक स्तरावरील इ. ९वी पुरतेच मर्यादित आहेत.

**जीवन कौशल्ये अर्थ :**

जीवन जास्तीतजास्त कार्यक्षमतने व यशस्वीपणे जगता यावे यासाठी विद्यार्थ्यांचीं अंगभूत कौशल्ये विकसित करण्यासाठी सातत्यपूर्ण व सुसंगत प्रयत्न म्हणजे जीवन कौशल्ये शिक्षण होय.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनातून इ. ९वी च्या मराठी पाठयपुस्तकातून भावनाचे समायोजन व ताणतणावाचे समायोजन या जीवनकौशल्याचा शोध घेतला आहे. त्यासाठी 'निरीक्षण' या साधनाचा तसेच सर्वेक्षण पध्दतीचा वापर केला आहे.

**संख्याशास्त्र साधन :**

निरीक्षण या तंत्राचा वापर केला आहे. तसेच शेकडेवारी /टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला आहे.

**पध्दती :**

संशोधकाने प्रथम इ. ९वी च्या मराठीच्या पाठयपुस्तकाचे हेतुपुरस्सर अभ्यास केला. गद्य पाठातून व पद्य पाठातून 'तणावाचे समायोजन' या कौशल्याचा शोध या पाठयक्रमातून घेतला. यासाठी ताण–तणावाशी संबंधीत आशय आहे का? याचा शोध घेतला त्याबरोबरच जर असा आशय असेल तर त्याचे समायोजन कसे केले आहे. कोणत्या गोष्टी सुचविल्या आहेत याचा शोध घेतला. तणावाचे समायोजनाशी निगडीत काही वाक्ये ओळी आहेत का याचाही शोध घेतला. कोणत्या पाठातून किती पाठातून या कौशल्याचा संदर्भात माहिती आली आहे. याचे प्रमाण शोधून निष्कर्ष काढले.

तणाव आल्यानंतर प्रत्यक्ष व्यक्तीच्या वर्तनातून व हावभावातून बघणाऱ्यांना त्याची जाणिव होते. साहित्यातून मात्र लेखक त्याबद्दल सांगतो. जर सांगितले नाही तर आपणाला संवादातून त्याचा बोध होतो.

असे काही संवाद कवितेच्या ओळी आलेल्या आहेत का? याचे प्रमाण शोधून त्याचें निष्कर्ष काढले.

**कार्यवाही :**

संशोधकाने प्रथम इ. ९ वी च्या पाठयपुस्तकाचे वाचन केले. वाचन केल्यानंतर जीवन कौशल्यावर आधारित यामध्ये काही उपक्रम आहेत का ? वाक्ये आहेत का ? संवाद प्रसंग घटना आहेत का ? याचा अभ्यास केला.

एकंदर पाठांच्या संख्येनुसार किती पाठात या गोष्टी आढळतात याचे प्रमाण काढले आणि निष्कर्ष काढले.

दरम्यान इ.९वी च्या प्रस्तावनेत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयाचा (2005) उल्लेख अपरिहार्य होता. त्यामुळे संशोधकाने या आराखडयामध्ये जीवनकौशल्ये विशेषता 'ताण–ताणवाचे समायोजन' या कौशल्याबाबत काही माहिती दिली ती पाहिली.

NCF-2005 च्या आधारे SCF ची निर्मिती झालेली आहे. त्यामुळे तो संदर्भ बघणे ओघाने आले.

**पाठयपुस्तकाचे विश्लेशण :**

इ. ९ वी च्या पाठयपुस्तकाचे विश्लेषण करताना जीवन कौशल्याशी संबंधीत काही घटना, प्रसंग, वाक्ये, उपक्रम याचा उल्लेख झाला आहे का ? उपक्रमात काही सुचवलेले आहे का ? या संदर्भातील माहिती गोळा केली.

| | | |
|---|---|---|
| गद्य | – | १६ पाठ |
| पद्य | – | १४ पाठ |
| स्थूलवाचन | – | ०४ पाठ |

साहित्याचे वर्गीकरण करून 'कोणकोणत्या साहित्य प्रकाराचा परिचय करून दिला आहे हे

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – VI April 2014

त्या अनुषंगाने लक्षात आले. गद्यपाठात लिळा, आत्मचरित्र, चरित्र, कथा, ललित इ. समावेश तर पद्य पाठात ओवी, अभंग, भूपाळी पासून सामाजिक कविते पर्यंतचा समावेश आहे.

**निष्कर्ष :–**

- १६ गद्यपाठापैकी २ पाठामध्ये ताणताणवाचे थेट वर्णन आले आहे. त्याचे प्रमाण ०.३२ % एवढे आहे.
- १४ पद्यपाठापैकी ३ कवितेमध्ये ताणताणवाचे समायोजन करण्यासंदर्भात उदाहरण दिली आहेत. त्याचे प्रमाण ०.४२ % एवढे आहे.
- 'जोडी आमचा सोबता' या कवितेच्या आशयातच सामर्थ्य आहे.
- ताणताणवाचे समायोजन/व्यवस्थापन करण्याच्या अनेक पद्धती आहेत. त्यामध्ये जी उदा. वारंवार दिली जातात, उल्लेख केला जातो ती उदाहरण आपणाला ज्ञानेश्वरी, तुकाराम, कान्होपात्राच्या अभंगामध्ये सापडतात.
- 'पडधवली' मध्ये सामाजिक बदलामुळे आलेल्या ताण–ताणवाचे वर्णन आहे.
- सामाजिक व्यवस्था येथील एखादया वर्गामध्ये जीवन संघर्श कसा उभा करते त्याचे वर्णन 'वाट' या कथेमध्ये दिसते.
- वाजवीपेक्षा जास्त अपेक्षामुळे आपणाला तणावाला सामोरे जावे लागते त्या वेळी काय करावे याचे वर्णन जो सर्वभूतांच्या ठायी' या ओवीमध्ये दिसते.

  प्रस्तावनेत सुद्धा जीवन कौशल्याचा उल्लेख करून त्या अनुशंगाने विषयाची मांडणी करण्यात आली आहे. तसेच पाठयपुस्तकाची मर्यादा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांची ज्ञान कक्षा रूंदाविण्यासाठी पाठयपुस्तकाबाहेर घेऊन जाण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. अर्थात त्या अनुषंगाने विचार करून शिक्षकांनी पाठ, त्याखालील उपक्रम, उद्दिष्टे याचा विचार करून अध्यापन केल्यास ही कौशल्ये साध्य होतील अन्यथा माध्यमिक शिक्षण मंडळाचा हेतू साध्य होणार नाही.

**पुढील संशोधनासाठी विषय :**

- प्राथ. शिक्षण व जीवन कौशल्याचा तुलनात्मक अभ्यास.
- राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयाचा 2005 चिकित्सक अभ्यास.

**संख्याशास्त्र साधन :**

निरीक्षण या तंत्राचा वापर केला आहे. तसेच शेकडेवारी / टक्केवारी या संख्याशास्त्रीय साधनाचा वापर केला आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

1. मुळे व उमाठेः शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नूतन प्रकाशन, पुणे.
2. कुमारभारती इयत्ता नववी महाराष्ट्र राज्य माध्य. व उच्च माध्य शिक्षण मंडळ पुणे.
3. राष्ट्रीय अभ्यासक्रम. २००५ आराखडा
4. माध्यमिक शिक्षण अभ्यासक्रम शिक्षक मार्गदर्शिका इ.९वी